1 7 JUL 2021
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात ६१ जणांचे रक्तदान

## रक्तदान मोहिमेस प्रतिसाद : विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी जपली सामाजिक बांधिलकी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'लोकमत रक्ताचं नातं' या उपक्रमाअंतर्गत शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ६१ जणांनी रक्तदान केले. विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांनी या शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाने (एनएसएस) या शिबिराचे संयोजन केले.



कोल्हापुरात गुरुवारी 'लोकमत' आणि शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. या वेळी डावीकडून विद्यापीठ सेवक संघाचे राजेंद्र खामकर, सुरेश पाटील, अजय आयरेकर, अतुल एतावडेकर, 'एनएसएस'चे संचालक अजय जायभाये, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, 'लोकमत'चे वरिष्ठ सरव्यवस्थापक मकरंद देशमुख, 'एनएसएस'चे कार्यक्रम अधिकारी एस. एस. बोथीकर, 'लोकमत'चे इव्हेंट अँण्ड मार्केटिंग विभागाचे उपव्यवस्थापक दीपक मनाठकर, 'एनएसएस'चे संग्राम मोरे उपस्थित होते.

विद्यापीठातील राजमाता जिजाऊ साहेब बहुउद्देशीय सभागृहात आयोजित रक्तदान शिबिराचे उदघाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, 'लोकमत'चे वरिष्ठ सरव्यवस्थापक मकरंद देशमुख प्रमुख उपस्थित होते. इव्हेंट अँण्ड मार्केटिंग विभागाचे उपव्यवस्थापक दीपक मनाठकर यांनी 'लोकमत रक्ताचं नातं' उपक्रमाची माहिती दिली. शिबिरातील रक्तदाते समाधान बहेरे, मकरंद लव्हटे, सुरेश पाटील, आदींना कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली. यावेळी 'एनएसएस'चे संचालक अभय जायभाये, कार्यक्रम अधिकारी अमोल कुलकर्णी, एस. एफ. बोथीकर, प्रभाकर माने, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अतुल एतावडेकर, शशिकांत साळोखे, सदानंद माने, राजेश चव्हाण, दीपक काशीद, सुरेखा आडके, वर्षा माने, विजय पाटील, अजय आयरेकर, संग्राम मोरे, आदी उपस्थित होते.

17 JUL 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवात 'विवेकानंद'सह न्यू कॉलेजची बाजी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग व न्यू कॉलेज यांच्या वतीने ४०वा युवा महोत्सव ऑनलाईन झाला. यात १९ प्रकारांच्या कलांसाठी स्पर्धा झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले.

न्यू व विवेकानंद कॉलेजने प्रत्येकी आठ पारितोषिके पटकावली. कॉमर्स कॉलेजने सहा, तर केआयटी व दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी यांनी पाच पारितोषिके पटकावली.

**विजेते असे :** रांगोळी : महेश मगदूम, ओंकार शिरगुप्पे, प्रेरणा कवठेकर. मराठी वक्तृत्व : स्वरदा फडणीस, जान्हवी परुळेकर, ऋतुजा देसाई. हिंदी वक्तृत्व : रुबिया मुल्ला, श्रुती सुतार, आरजू शेख. शास्त्रीय गायन : सानिका फडके, शीतल पोतदार, कैवल्य पाटील. शास्त्रीय नृत्य : ऋतिका निने, सार्थक भिलारी, मनाली संकपाळ. व्यंगचित्र : अतुल कापडे, प्रिया कांबळे, शुभम कांबळे. शास्त्रीय सूरवाद्य : ओमकार सुतार, मयूरेश शिखरे, ऋतुराज धूपकर. भित्तीचित्र : केवल यादव, प्रतिभा दुंगडे, तृप्ती पटेल. एकपात्री अभिनय : सौरभ करडे, स्वरदा फडणीस, आकाश पाटील. सुगमगायन : प्रतीक्षा पोवार, शीतल पोतदार, कैवल्य पाटील. पाश्चिमात्य वाद्यवादन : ऋषिकेश गुरव, मयूरेश शिखरे, ओमकार सुतार. कातरकाम : केवल यादव, सूचिता तारळेकर, विवेक कांबळे. मेहंदी : प्रणोती पाटील, निराली मामनिया, ऋचिता बोरा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUL 2021
पुढारी

# 'ग्राऊंडवॉटर अवेअरनेस : अ नीड ऑफ टाईम' विषयावर कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामार्फत 'भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा आणि राष्ट्रीय सेवा योजनेतंर्गत पर्यावरण विभागाची 'ग्राऊंडवॉटर अवेअरनेस : अ नीड ऑफ टाईम' या विषयावर नुकतीच कार्यशाळा झाली. कार्यशाळेस भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे संचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, शिक्षण व प्रसाराविषयी माहिती दिली. प्राचार्य डॉ. ए. आर. कुलकर्णी यांनी ग्राऊंडवॉटर अवेअरनेसचे महत्त्व विषद केले. रिषिराज गोस्की यांनी 'ओव्हरव्ह्यूव्ह ऑफ ग्रॉऊंडवॉटर कंडिशन इन महाराष्ट्र' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. ए. आर. कुलकर्णी यांनी 'ग्राऊंडवॉटर एक्सप्लोरेशन अँड एक्सप्लॉयटेशन' विषयावर, तर प्रा. प्रियांका मगदूम यांनी 'ग्रॉऊंडवॉटर पोल्युशन, क्वालिटी अँड रिचार्ज' विषयावर सादरीकरण केले. प्रा. तेजस्विनी चिले यांनी स्वागत केले. प्रा.निराली गिलबिले व प्रा योगिता मिरजकर यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUL 2021
पुढारी

# 'बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचे पैशाचे व्यवस्थापन' विषयावर वाणिज्य विभागातर्फे वेबिनार

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या वतीने 'बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचे पैशाचे व्यवस्थापन' विषयावर शनिवार, दि.१७ रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. प्रोफिसियंत माइंड संस्थेचे सुहास रजपूत व्याख्यान देणार आहेत. पैशाच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने दुय्यम बाजाराची समज, गुंतवणूकदार बनण्याची प्रक्रिया, बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचा शिक्षण पुढाकार, म्युच्युअल फंड, सेबी व तक्रार निवारण प्रणालीबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन असणार आहेत. बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचे अधिकारी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUL 2021
पुढारी

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या ४० व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सव स्पर्धेत यश संपादन केले.

महोत्सवात अतुल कापडे, व्यंगचित्र (प्रथम क्रमांक), निहाल रुकडीकर, नकला (प्रथम), सार्थक भिलारी, शास्त्रीय नृत्य (द्वितीय), शास्त्रीय सुरवाद्य, मयुरेश शिखरे (द्वितीय), मातीकाम, रोहित घोलप (द्वितीय), पाश्चिमात्य एकल गायन, ओंकार पाटील (द्वितीय), पाश्चिमात्य वाद्यवादन, मयुरेश शिखरे (द्वितीय), शास्त्रीय तालवाद्य, मयुरेश शिखरे (तृतीय) यांनी यश मिळविले.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUL 2021
सकाळ

# वाणिज्य विभागातर्फे आज वेबिनार

**उजळाईवाडी :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचे 'पैशाचे व्यवस्थापन' यावर शनिवारी (ता. १७) सकाळी अकराला वेबिनार होणार आहे. प्रोफिसियंत माइंड संस्थेचे सुहास रजपूत व्याख्यान देतील. पैशांच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने दुय्यम बाजाराची समज, गुंतवणूकदार बनण्याची प्रक्रिया, बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचा शिक्षण पुढाकार, म्युचुअल फंड, सेबी व तक्रार निवारण प्रणालीबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. वेबिनारच्या अध्यक्षपदी विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन असतील. बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचे अधिकारी विद्यार्थ्यांचे शंकानिरसन करतील. शेअर बाजाराविषयी जागरुकता निर्माण करून त्याबाबतची कौशल्ये विकसित करणे या उद्देशाने वेबिनारचे आयोजन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUL 2021

तरुण भारत

# पैशाचे व्यवस्थापन विषयावर आज विद्यापीठातर्फे वेबिनार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्यावतीने बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचे 'पैशाचे व्यवस्थापन' या विषयावर शनिवार १७ रोजी सकाळी ११ वाजता वेबिनार होणार आहे. प्रोफिसियंत मांइड या संस्थेचे श्री. सुहास रजपूत हे व्याख्यान देणार आहेत. पैशाचे व्यवस्थापनाच्या दृष्टीने दुय्यम बाजाराची समज, गुंतवणूकदार बनण्याची प्रक्रिया, बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचा शिक्षण पुढाकार, म्युच्युअल फंड, सेबी व तक्रार निवारण प्रणाली इत्यादी बाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. या वेबिनारच्या अध्यक्षपदी विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन हे असणार आहेत. बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचे अधिकारी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करणार आहेत.